# तोरण

अंक ९१-९२ एप्रिल - सप्टेंबर २०१२

## अनुक्रमणिका

संपादकीय

बिरोबाच्या मेंढ्या आणि
गावडे धनगर

वांदर आला, वांदर आला

ये रे ये रे पावसा

देह देवाचे मंदिर.....

घडामोडी

## संपादकीय

एखादी छान गोष्ट ऐकायला कुणाला आवडत नाही? गोष्ट म्हटली की आपल्याला आठवण येते ती आपल्या बाळपणाची. अुन्हाळ्यातल्या लांबलेल्या संध्याकाळी किंवा थंडीच्या दिवसात लवकर अंधार पडल्यावर सांजवेळी, घरातली सर्व कामे आटोपल्यानंतर आजी आजोबांनी, आईवडिलांनी, काकाकाकूंनी, मामामामींनी किंवा इतर कुणी वडिलधाऱ्या मंडळींनी सांगितलेल्या सुरस गोष्टी ह्याचे फार आकर्षण असायचे. त्या वेळेची सर्व बालगोपाळ मंडळी वाट पहात असायची. पण हा काळ होता टेलिव्हिजनने घरात प्रवेश करण्याअगोदरचा. आज आपला जीवनक्रमच बदलून गेला आहे. आता प्रत्येकजण आपल्या

देणगी मूल्य : रु. ५/-

आवडत्या लोकप्रिय मालिका बघण्याकरता टिव्हीकडे धाव घेत असतो. घरांतले रोजचे सर्व कार्यक्रम टिव्हीतल्या कार्यक्रमांच्या वेळापत्रकानुसार आखले जातात. मालिका मधला कुठलाही रसभरीत किंवा अतिरंजित भाग चुकू नये याकडे लक्ष असते. आपल्या आवडीचा कार्यक्रम सुरु व्हायच्या अगोदर गायीची धार काढायला पाहिजे, स्वयंपाकही मालिका सुरु व्हायच्या अगोदर पूर्ण व्हायला पाहिजे, हे सर्व सांभाळले जाते. त्यानंतर मात्र आपण सर्व बुध्दि बाजूला ठेवतो आणि कार्यक्रम पाहायला सुरुवात करतो. टिव्हीवर दाखवलेले सर्वच काही खरे नसते व आपल्याला सर्व पटते असेही नाही. पण हालत्या बोलत्या चित्रांचे आकर्षण आपल्याला खिळवून ठेवते. इंग्रजीमध्ये टिव्हीला इडियट बॉक्स (Idiot Box) असे म्हणतात ते नाव सार्थ आहे असे काही वेळा वाटते.

हा झाला आजचा जमाना. परंतू, पूर्वीच्या काळाचा आपण विचार केला तर आपल्याला असे जाणवते की आपल्या लोककथांमध्ये किंवा वाडवडिलांनी सांगितलेल्या इतर कथांमध्ये काहीतरी संदेश असायचा. असे संदेश समाजमनावर नकळत चांगले संस्कार घडवत असायचे. समाजाकरता त्याचे महत्व असायचे. यातून जे धडे आपण घेत असू त्यांचा आपल्या वाईट काळांत व चांगल्या काळात, दोन्हीही वेळी सर्व प्रसंगांना तोंड देण्याकरता अुपयोग व्हायचा. समाजातल्या बालकांनाही यातून आपोआप शिकवण मिळत असे.

अशा काही लोककथांना त्या नाहीशा होण्याअगोदर पुन्हा थोडा अुजाळा दिला तर तोरणच्या वाचकांना आवडेल असे आम्हाला वाटले. समाज आज परंपरेपासून अधुनिकतेकडे मोठी झेप घेत असतानाही, त्यांतून जे संदेश मिळतात ते बऱ्याचशा बाबतीत आजही लागू आहेत. ह्या अंकामध्ये आम्ही रत्नागिरी भागातल्या एका आधुनिक कथेचाही समावेश केला आहे.

ह्या गोष्टी तुमच्या समोर ठेवताना आम्हाला जेवढा आनंद होतो आहे, तेवढाच आनंद त्या वाचून तुम्हाला मिळेल अशी आशा आहे. जाता जाता सर्वांना एक विनंती. तुमच्या संग्रही असलेल्या अशाच काही गोष्टी आम्हालाही कळवाल कां? आम्ही वाट पहात आहोत.

**डॉ. नित्या घोटगे**
संचालिका, अंतरा संस्था, पुणे.

# बिरोबाच्या मेंढ्या आणि गावडे धनगर

ज्यांच्याकडे गायींचा वाडा असायचा ते लोक म्हणजे गायवाडे. गायवाडेचेच पुढे गावडे झाले. अगदी सुरुवातीचे गावडे गायी म्हशी, बैल चरायला घेऊन जायचे व त्यांचा सांभाळ करायचे. असे बरेच गावडे पशुपालक होते. पुढे त्यांची एक स्वतंत्र जातच झाली. बिरोबा देवानी मेंढ्यांची अुत्पत्ती केल्यानंतर ते मेंढ्या पाळायला लागले.

मेंढ्या कशा अुत्पन्न झाल्या त्याची एक कथा अशी आहे. एका गावात एके ठिकाणी मोठे वारुळ होते. बळीराजा तिथे त्या जागेवर नांगरायला गेला. वारुळावरुन नांगर गेल्यावर त्यातून मेंढ्या बाहेर आल्या व ओरडायला लागल्या. बळीराजाने लगेच काट्याकुट्या गोळा केल्या, वारुळाभोवती टाकल्या व पेटवून दिल्या. ज्या मेंढ्या पूर्ण जळल्या त्या काळ्या झाल्या, ज्या जराशा धुरकटल्या त्यांच्या अंगावर भाजल्याचे चट्टेपट्टे अुठले, ठिपके अुठले. त्या मेंढ्या म्हणजे चिवली, करपारी, खडली. थोडी भाजली ती भिंगारी. असे त्याचे रंग पालटले. बिरोबादेवानी इंद्राच्या दरबारातून जेव्हा प्रथम मेंढी आणली तेव्हा ती दुधासारखी पांढरीशुभ्र होती. इथे आल्यावर मेंढ्यांचे रंग बदलले. आज आपण ज्या धनगरांना खुटकर म्हणतो ते आधी गावडेच होते. बिरोबाने खुटकरांकडे मेंढ्या पाळायला दिल्या. खुटकरांनी त्या मेंढ्या कोंडवाड्यात कोंडून ठेवल्या व आठ दिवस लग्नाला गावी निघून गेले. ती मुकी जनावरे भुकेनी हैराण झाली, तहानेनी व्याकुळ झाली. ब्या, ब्या करुन ओरडायला लागली. ह्या कुंपणात डोक घाल, त्या कुंपणात डोक घाल असे करुन त्यांनी वाड्याचा झोपा पाडला. मेंढरं बाहेर पडली व इकडे तिकडे पांगली. आठ दिवसांनी परत आल्यावर, खुटकर मेंढरांना शोधायला लागले. पण मेंढ्या होत्या कुठे जागेवर ! मग गेले बिरोबादेवाकडे आणि त्याला म्हणाले, ‘तू आम्हाला पोट भरण्याचे साधन दिलेस पण आता त्या मेंढ्या कुठे गेल्या ते आम्हाला सांगता येणार नाही’. बिरोबादेव म्हणाले, ‘आता तू हा माग घे व त्यावर घोंगड्या विण’. मागाचा खुंटा बिरोबाने त्यांच्या हातात दिल्यामुळे त्यांना खुंटकरी धनगर म्हणतात.

आता बिरोबाने मेंढ्याची हाटी, म्हणजेच जबाबदारी स्वतःकडे घेतली. तो स्वतःच त्यांचा सांभाळ करायला लागला. ज्या वेळेला त्याने मेंढ्या काळसेन डोहामध्ये न्हायला नेल्या तेव्हा एक काठावरुन मेंढ्या डोहात घातल्या व दुसऱ्या काठावरुन बाहेर काढल्या. पलिकडल्या मेंढ्या मोजल्यावर एक मेंढी व एक बालिंगा कमी दिसला. डोहात मशा राक्षस होता. त्याने एक मेंढी व एक बालिंगा लपवून ठेवला होता. पुढे धारेला, नदीच्या पाण्यात भिजलेल्या मेंढ्या बाहेर आल्यावर बिरोबादेवाच्या ते लक्षात आले. काय झाले आहे ते त्याने ओळखले. बिरोबादेवाने एक गोफण घेतली, एक धोंडा घेतला आणि गोफणीत धोंडा गरगर फिरवून तो धोंडा पाण्यात सोडला. धोंडा मशा राक्षसाला लागून तो मेला. मेंढी व बालिंगा धावत धावत बाहेर आले. काही दिवस खिल्लार सांभाळणाऱ्या

बिरोबाने मेंढ्या सांभाळल्या होत्या. आता बिरोबाने मेंढ्यांची हाटी हाटकरांकडे सोपवली. तेव्हापासून परंपरेने हाटकरांकडे मेंढ्या पाळण्याची जबाबदारी आहे. मध्यंतरी ती खुटकरांकडे दिली होती. पण त्यांना जबाबदारी पाळणे जमले नाही. म्हणून परत ती हाटकर धनगरांकडेच आहे. आजपर्यंत हीच वहिवाट, हीच प्रथा आहे.

बिरोबादेवाच्या मेंढीलाही हाटी म्हणतात. बिरोबादेवाने दिलेली हाटी सांभाळणारे म्हणून हाटकर हे नाव पडले.

गावड्यांच्या पुढे दोन कुळ्या झाल्या व एक कुळी राहिली. जे गायीम्हशी सांभाळत राहिले ते गवळी. ते गायीम्हशींचे दूध काढायचे, दूधताक विकायचे. मेंढ्या कापून व तुकडे करुन विकतात ते खाटीक. ही अर्धी कुळी. ते खाटीकही आहेत आणि धनगरही आहेत. म्हणजे अर्धी कुळी खाटीक आणि अर्धी कुळी धनगर. मेंढरं पाळायच सोडून ज्यांनी माग हातात घेतले ते खुंटकरी. मेंढ्यांची हाटी सांभाळणारे हाटकरी. बिरोबादेवाच्या मेंढीलाही हाटी म्हणत असल्यामुळे त्यांची हाट्टी म्हणजे कळप. हाटकरी हे हाट्टी सांभाळतात. खंडोबाची बानुबाई आणि धनगरांची बानुबाई ह्याही हाट्टीच्याच मालकिणी आहेत.

सुरुवातीला सगळेच गावडे. त्यांच्या गावडे (गवळी), खुटकर, हाटकर अशा तीन कुळ्या झाल्या व खाटीक धनगराची अर्धी कुळी. अशा गावड्यांच्या साडेतीन कुळ्या आहेत. ह्याचप्रमाणे मेंढ्याच्याही चार कुळ्या म्हणजे चार प्रकार आहेत. त्यांची नावे फडकानी, शाळानी, बुट्टी, घुनी अशी आहेत. बिरोबा हा धनगरांचा देव. त्याने हाटकरांकडे मेंढ्या सांभाळायला दिल्या. त्यांच्या मते, बिरोबाने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे आजपर्यंत त्यांनी मेंढ्या सांभाळल्या व ह्यापुढेही सांभाळणार.

(सोंथायमर कल्चरल असोसिएशन – वाड्यावरील गोष्टी, २००२ यातील गोष्टीवर आधारीत)

## धनगरवाडा

बोली चालीत ऐकवलेल्या कथा, गोष्टी काही संकेत, संदेश देत असतात. कथेचा उद्देश, कथारुप यावरुन समाजाचा वेगळाच इतिहास समोर येतो. समाजमन काय आहे याची झलक दिसू लागते. त्यामुळे या कथा समाजमनाचा आरसा आहेत. त्या एक न सांगितला गेलेला, न दिसणारा इतिहास सांगत असतात. अशाच एका छोट्या कथेचा उल्लेख येथे करत आहे.

**धनगरवाडा .....**

पूर्वी फक्त तीनच वाडे होते. एक राजवाडा, दुसरा रामोशी वाडा आणि तिसरा धनगरवाडा. राजवाडा राजकारणाने संपला. राजेशाही गेली. लोकशाही आली. रामोशी समाजसुध्दा मेंढर पाळायचा. पण आमची जी धनगर म्हणजे मेंढपाळ अशी ओळख आहे ती तो टिकवू शकला नाही. त्यामुळे रामोशीवाडा संपला. आम्ही धनगर आयुष्यभर प्रामाणिकपणाने वागतो. आमचा वाडा आजतागायत शिल्लक आहे. आम्ही गावोगाव

प्रवास करतो. आमचा वाडा अजून मोडला नाही. कोणी मोडू शकणार नाही.

ही कथा दोन गोष्टीवर जोर देते. एक म्हणजे, धनगर म्हणतात, आम्ही प्रामाणिक आहोत. आम्ही नियत पाळणारे आहोत. दुसरे हे की ज्यांनी नियत मोडली ते स्वतः मोडले. काहीजण याला नीती कथा म्हणतील. या मताशी सहमती दाखवतानाही दुस–या बाबीकडे लक्ष वेधावे वाटते. ती ही की या कथेतून धनगर समाज स्वतःच्या अस्तित्वाबद्दल बोलताना दिसतो. कथेला पुरावा म्हणून तो आजही टिकून असलेल्या धनगरवाड्याचा उल्लेख करतो. आपल्या कामाबद्दलची निष्ठा, प्रामाणिकपणा, नितीमत्ता याबद्दल बोलून तो इतरांनाही नितीमत्तेचे धडे देतो.

कथा– खंडू करगळ, गाझीपूर
संकलन व विश्लेषण– जितेंद्र मैड

# वांदर आला, वांदर आला

पूर्वी कोकणांत जंगल ब–यापैकी होते. त्यामुळे माकडांना गावाकडे फारसे फिरकावे लागत नसे. पण त्यांच्या निवासाची स्थाने आणि ज्यापासून त्यांना अन्न मिळते अशी फळझाडे कमी कमी होत चालल्यामुळे, खाद्याच्या शोधात बाहेर पडण्याशिवाय त्यांना पर्यायच राहिलेला नाही. अशा ह्या आजकालच्या आधुनिक काळातल्या, शेतक–यांच्या अनुभवातल्या माकडकथा.

कोकणात मोठ्या माकडांना वानर किंवा वांदर म्हणतात व छोट्या माकडांना केल्डी म्हणतात.

१. पूर्वी माकडं जर गावात आली तर पूर्ण गाव त्यांना परत रानात नेऊन सोडायचा. पण आता कोकणात हे प्राणी मानवी वस्तीत येऊ लागले आहेत. म्हणून गावातल्या लोकांनी काय केले? तर गावातील सर्व महिला, पुरुष व मुले यांनी एकत्र येऊन, ढोल, ताशे, ताटे घेऊन मोठमोठ्याने आवाज करत माकडांना गावाच्या सीमेपर्यंत पिटाळले आणि सर्व गावकरी परत गावात आले. पाहतात तर काय? माकडे त्यांच्या अगोदरच गावात परत आलेली होती. त्यांना जंगलात खायला काही मिळत नाही म्हणून ती परत मानवी वस्तीकडे आली.

२. तरवळ गावात तर गंमतच झाली. एका शेतक–याने माकडांना हाकलण्यासाठी ताशे आणले व वाजवायला सुरुवात केली. सर्व माकडे आवाजाने पळून गेली. एक आठवडाभर गावाकडे फिरकली

नाहीत. दुस–या आठवड्यात परत माकडे आल्यावर शेतक–याने ताशे वाजवायला सुरुवात केली. यावेळी माकडे पळून गेली नाहीत. ती शांतपणे बसून ताशांचा आवाज ऐकत राहिली. आणखी काही दिवसांनी परत शेतक–याने ताशे वाजवायला सुरुवात केली. ताशे वाजू लागले तसे माकडांनी नाचायला सुरुवात केली. त्यांच्या या माकडचेष्टा बघून शेतक–याने शेवटी ताशे वाजवायचे बंद केले.

३. माकडे बिबट्या वाघाला घाबरतात म्हणून एका शेतक–याने बिबट्याचे चित्र असलेला एक फोटो आणून शेतात लावला. पहिल्या दिवशी माकडांनी फोटो बघितल्यावर ती घाबरली व पळून गेली. दुसऱ्या दिवशी परत आल्यावर बिबट्या त्यांना तिथेच, त्याच जागेवर दिसला. माकडे शहाणी होती. त्यांनी त्या फोटोचा अभ्यास केला. निरिक्षण केले. काही हालचाल होते आहे का याकडे लक्ष दिले. परंतु वाघाची काहीच हालचाल नव्हती. तेव्हा घाबरायचे काहीच कारण नाही हे माकडांच्या लक्षात आले.

४. पंधरावीस वर्षापूर्वी आमच्या गावात खूप जंगल होते. तेव्हा वानर जंगलातच राहायचे, खायचे. त्यांचा वावर तिथेच असायचा. त्यावेळेस क्वचित एखाद्या वानराचे दर्शन व्हायचे. किंवा जंगलात गेल्यावर एखाद्या मोठ्या झाडावर वानर बागडताना दिसायचे. तेव्हा वानराला पाहिल्यावर शेतकरी राम! राम! म्हणून भक्तिभावाने हात जोडायचे व नमस्कार करायचे. परंतु आता उलटे झाले आहे. शेतकरी म्हणतात की, जसे वाल्मिकी म्हणजे पूर्वीचा वाल्या, आपली पापे कमी करण्याकरता तपश्चर्येला बसला व सुरुवातीला मरा! मरा! मरा! असा जप करायला लागला पण राम हा शब्द त्याच्या तोंडून येत नव्हता. जशी त्याची तपश्चर्या फळाला यायला लागली तसा राम! राम! हा जप तोंडून यायला लागला. शेतकऱ्यांच्या बाबतीतही असेच काहीसे झाले आहे. आता वानरांच्या गावातल्या अति वावरामुळे, त्यांना बघितल्यावर गावातले लोक व शेतकरी रामच्या ऐवजी मरा! मरा! असे म्हणून त्यांना पिटाळून लावू लागले आहेत.

५. माकड हा प्राणी कुत्र्याला खूप घाबरतो. म्हणून एका शेतक–याने कुत्रे पाळले. कुत्रा धावला की माकडे जीव घेऊन पळून जातात. शेतक–याने माकडांना पळवून लावण्याकरता कुत्रा शेतात बांधून ठेवला. तेव्हा मात्र माकडांनी कुत्र्याला बांधलेला बघून त्याला ठार मारला.

६. माकडांना स्वच्छता खूप आवडते. म्हणून माकडे शेतात ज्या ठिकाणी येतात तिथे माकडांची विष्ठा आणून फवारणी केली किंवा पसरली तर माकडे त्या ठिकाणी येत नाहीत व पिकांची नासधूस करत नाहीत तसेच कुजलेले जिन्नस, शेण, गोमूत्र फवारले तर शेतात किंवा आजूबाजला माकडे येत नाहीत. माकडांची वस्ती नेहमी

ठराविक ठिकाणी असते. त्या ठिकाणाहून माकडे शेतात येऊन नासधूस करतात. निसर्ग नियमाप्रमाणे छोटे प्राणी मोठ्या प्राण्यांना घाबरतात किंवा ठराविक प्राणी हे ठराविक प्राण्यांचे खाद्य असते. अुंदीर मांजराला घाबरतो त्याप्रमाणे माकडे बिबट्या वाघाला खूप घाबरतात. म्हणून बिबट्यांची विष्ठा शेताच्या आजूबाजूला ठेवल्यास माकडे जवळ येत नाहीत. त्यांना वाटते की या भागांत बिबट्याचा वावर आहे. ह्याचा प्रत्यक्ष अनुभव माचवेवाडीच्या एका शेतक–याने घेतला आहे. त्याने बिबट्या वाघाची विष्ठा आणून त्याच्या शेताच्या आजूबाजूला ठेवली व त्याचा परिणाम म्हणजे माकडे शेताजवळ फिरकलीही नाहीत. आणि शेताचे नुकसान झाले नाही.

७. आंबा, काजू, किंवा इतर फळे खाली पडली असली तर माकडे खात नाहीत. खाली पडलेले फळ जरी पूर्ण पिकलेले असले तरी माकडे तोंड लावत नाहीत. माकडे फक्त झाडावरची फळेच खातात.

८. पूर्वी घराच्या आढ्यावरुन वानर गेले तर घर मोडून नवीन घर बांधायचे. घरावरुन वानर गेले तर काहीतरी आरिष्ट घडणार असा समज होता. पण आता वानर घरावरुन जाऊन नळ्यांचे, कौलांचे नुकसान करतात व घरातसुध्दा जातात. सध्या कोकणात, काही भागात, माकडे घरात जाऊन सरळ भात, भाकरी व इतर जेवण खातात. कधीकधी डबा अुघडून लाडू वगैरेही खातात. एवढी माकडे धीट झाली आहेत.

९. पूर्वी वानरांना शिव्या दिल्या तर ती शेतात नासधूस करतात असा समज होता. म्हणून लोक त्यांना शिव्या देत नसत. किंवा दगड मारत नसत. परंतु आता परिस्थिती अुलट आहे.

**राजन कुलये,**
कार्यकर्ता,
अंतरा संस्था, पुण

# ये रे ये रे पावसा

या वर्षी पाऊस खूपच कमी पडला. पुणे जिल्हातील भोर वगळता सर्व तालुक्यात दुष्काळ जाहीर झाला. पावसाच्या लहरीपणामुळे सारेच हैराण झाले आहेत. पाऊस कमी का झाला याची वेगवेगळी कारणे मांडली जात आहेत. त्यापैकी सर्वश्रुत असलेली कारणे अशी–

१. पृथ्वीचे वातावरण तापल्यामुळे (ग्लोबल वार्मिंग), हवामानात बदल झाला असून त्याचा परिणाम पावसावर झाला आहे.

२. पाऊस हा पूर्वीपासूनच लहरी आहे. तो कमी जास्त पडत असला, तरी त्यामध्ये फारसा बदल झालेला नाही.

३. माणसाची नियत बदलली त्यामुळे पाऊसही बदलला.

वरील पैकी पहिली दोन कारणे हवामान आणि पर्यावरण या क्षेत्रात तज्ञ असलेल्या मंडळीकडून सांगितली जातात. तिसरे कारण सर्वसामान्य माणसांकडून (शेतकरी, वारकरी इ.) व्यक्त होते. पावसाचे आडाखे हवामान खात्याकडून वेळोवेळी जाहीर होत असतात. या आडाख्यांवर लोक फारसा विश्वास ठेवत नसले तरी नविन तंत्रज्ञानामुळे उपग्रहाव्दारे आकाशातून काढलेल्या फोटोंमुळे भारतभूमीवर अवकाशात कोठे काळे ढग जमा झालेत, चक्रीवादळ कोठे होणार याचे चित्र डोळ्यासमोर येऊ लागले आहे. आधुनिक वैज्ञानिक आराखडे आणि पारंपरिक अंदाज वर्तवण्याच्या पध्दतीत नेहमीच एक व्दंव्द दिसले आहे. तज्ञ मंडळी मोठमोठी आकडेवारी, फोटो, संशोधन साहित्य यांची मांडणी करत आपले निष्कर्ष जगापुढे मांडतात. सर्वसामान्य माणसे त्यांच्या रोजच्या जीवनातील उदाहरणे, निरिक्षणे, पिढ्यानपिढ्या एकलेल्या कथा, सांगीवांगी यांचा आधार घेवून अंदाज व्यक्त करतात. त्यांच्या बोलण्याला लेखी पुरावा नसल्याने, आधुनिक जगातील ज्ञानवंतांच्या मोजमापाच्या साधनात त्यांचे म्हणणे तपासता येत नसल्याने दंतकथा, समज असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. दंतकथा, लोकसमज यांच्याकडे अभ्यासू वृत्तीने पाहून, त्यातून काही निष्कर्ष काढता येतील का हे पहावे, निदान त्यांचे म्हणणे दुर्लक्षू नये, त्याची नोंद घ्यावी असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते. म्हणूनच आमचा अनुभव या लेखातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

हवामानाचा अंदाज वर्तवण्यासाठी हवामान खाते काही घटक, गृहीतांचा आधार घेवून अंदाज वर्तवते.

हवामान खात्याने या वर्षी सरासरीपेक्षा ४ टक्क्याने कमी म्हणजे ९६ टक्के पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला होता. प्रत्यक्षात मात्र फारच कमी पाऊस पडल्याचे दिसत आहे.

पावसाबाबत पंचांगात काय लिहले आहे, कोणते नक्षत्र, कोणत्या वाहनावर येणार आहे याबाबत सर्वसामान्य शेतकऱ्यांना उत्सुकता असते. ज्योतिष्य शास्त्र सांगणारी मंडळी ग्रह, तारे, नक्षत्र, घटिकांचा अंदाज घेवून पावसाचा अंदाज वर्तवतात. यावर्षीच्या दाते पंचांगात मध्यम, तुरळक स्वरुपाचा पाऊस होईल असे भविष्य वर्तवले आहे. यंदाचे वर्ष नंदनामसंवत्सर आहे. सहदेवभाडळीच्या कथनानुसार यावर्षी कमी पाऊस होईल असेच सांगितले आहे. पूर येथील ज्योतिषी व भाडळीशास्त्र सांगणा–या आजोबांनी सांगितले की, रवी–मंगळ युती दोन वेळा झाली तर पाऊस कमी पडतो. रवी–बुध युती झाली तर पाऊस जास्त होतो.

ज्यांना पंचाग वाचता येत नाही आणि हवामानखात्याचा अंदाज छापलेले वर्तमानपत्र वाचता येत नाही अशा मंडळींना निसर्ग वाचता येतो. निसर्गातील बदल त्यांच्या नजरेला जाणवतात आणि त्यावरुन ते पावसाचा अंदाज वर्तवतात. यावर्षी काजवे कमी होते, मृगाची पाखरे निघाली नाही. त्यामुळे पाऊस कमी होणार याचा अंदाज या मंडळींना आधीच आला होता. शेतकरी, मेंढपाळ, इत्यांदींचे पावसाबद्दलचे आडाखे पुढे देत आहोत.

१. कोका नावाचा एक पक्षी रात्री उत्तरेकडून दक्षिणेकडे जातो. तो लाल मांसाच्या गोळ्यासारखा दिसतो. तो जायला लागला की पाऊस येणार असा अंदाज शेतकरी बांधतो.

२. कुडकुड कुंभा या पक्षाने घरटे बांधायला सुरुवात केली की पंधरवड्यात पाऊस होणार. काही ठराविक झाडे रात्री चमकतात. यावर्षी त्यांची चमक कमी आहे. चमक जास्त असली तर पाऊस जास्त पडणार.

३. पाऊस चालू व्हायच्या अगोदर आटलेल्या झऱ्याच्या जागी ओलावा येतो. पाऊस येणार असेल तर झरे भरतात.

४. भीमाशंकर भागात असलेले हिंदुळा रान हे पाऊस येणार असेल तर ओले होते. यावर्षी तसे जाणवले नाही.

५. पाऊस सुरु व्हायचा असेल तर जनावर भिंतीवर लाथा मारते.

६. मृग नक्षत्र सुरु झाल्यानंतर जर कळपातील सर्व मेंढ्या आकाशाकडे तोंड करुन वर बघायला लागल्या व विशिष्ट आवाज करायला लागल्या तर पाऊस लवकरच येणार असा मेंढपाळांचा समज आहे.

७. नदीत एखाद्या ठिकाणी घोटाभर पाणी असेल व जर ते अचानक वाहून गेले तर दुसऱ्या दिवशी पूर येईल इतका जोरदार पाऊस येईल असे कोकणातील लोकांचे म्हणणे आहे.

८. शनिवारी, रविवारी किंवा मंगळवारी एकादशी आली तर पुढील एक महिना पाऊस पडणार नाही असे सहदेव भाडळी म्हणतात.

९. उन्हाळा संपायच्या सुमाराला जर बगळ्यांची माळ पश्चिमेकडे उडत जाताना दिसली तर पाऊस लवकर येणार असे समजतात.

१०. पंखाचे मुंगळे किंवा बारीक किडे खूप प्रमाणात जमिनीतून बाहेर पडायला लागले तर ती पाऊस लवकर येणार याची खूण आहे असे समजतात.

११. चालता चालता मेंढरे पुढे न जाता अचानक एखाद्या झाडाखाली किंवा रस्त्याच्या कडेला एकत्र गोळा झाली व तिथेच थांबली तर सात आठ दिवसात पाऊस येईल असे समजतात.

दक्षिणेकडचे ढग उत्तरेकडे फिरले की लोक पेरणीला सुरुवात करतात. यावेळी दखन फिरल्याचे दिसलेच नाही. गेल्या तीन वर्षापासून तिन्ही ऋतूत बदल झालेला दिसत आहे. गेल्या वर्षी प्रत्येक महिन्यात पाऊस झाल्याचे दिसले. ७१च्या दुष्काळात सुरुवातीला पाऊस झाला. पण गौराई नंतर तो झालाच नाही. आत्ता तसे होवू नये अशी भिती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. यावर्षी वळवाच्या वीजा कडाडल्या नाही. पाऊस मोजक्या पट्ट्यात पडतोय. गावाकडचा पाऊस कमी झाला आहे. जुन्नर तालुक्यातील कुकडेश्वर भागात चार महिने पाऊस व्हायचा. आता तसे राहिले नाही.

पूर्वेकडून येणाऱ्या पावसाला गरा पाऊस म्हणतात. पश्चिमेकडून येणाऱ्या पावसाला रापा (मोसमी) पाऊस म्हणतात.

पावसावर अनेक म्हणी, गाणी, कथा आहेत. ज्यातून आपल्याला पावसाचा अंदाज व्यक्त करण्याचे आडाखे समजू शकतात. आपल्याकडे अशी काही माहिती असेल तर आम्हाला अवश्य कळवा....

जितेंद्र मैड, पुणे.

## देह देवाचे मंदिर.....

अगोदर काहीच नव्हते. सगळीकडे पाणजंजाळ होते. मंग परमेश्वराने तेहतीस कोटी देव निर्माण केले. पण त्या महासागरात तशाच पडून होत्या. परमेश्वराने त्यांच्यामध्ये भूक आणि तहान घातली. तरीपण या देवांना चैन नव्हती. ते अस्वस्थ होते. हे देव परमेश्वराला म्हणाले आम्हाला राहण्यासाठी घर पाहिजे. जेवण करता येईल अशी जागा मागितली. परमेश्वराने पशुसृष्टी तयार केली. बैल, घोडे, बकरी असे पशु तयार करुन देवांपुढे उभे केले. परंतु देवांनी त्यात प्रवेश करायला नकार दिला. शेवटी परमेश्वराने माणूस तयार केला. आणि देवांना त्यात प्रवेश करायला सांगितला. माणसाचे शरीर आपल्याला राहण्यासाठी योग्य आहे असे देवांना वाटले. त्यांनी माणसाच्या शरिरात प्रवेश केला. अग्नीदेव वाचा बनून मुखात घुसला. वायुदेव प्राण होवून नाकपुड्यात घुसला. सुर्यदेव डोळ्यात घुसला. चंद्र मन बनुन हृदयात घुसला. यमदेव बेंबीत घुसला. जलदेव जननेंद्रियात घुसला. अशा तऱ्हेने तयार झालेला माणुस देवांचे निवासस्थान बनला. पण भूक आणि तहान यांना जागा नव्हती. मंग परमेश्वराने त्यांना प्रत्येक देवतांमध्ये भागीदार बनवले. देव आपल्या शरीरातच आहे असे त्यासाठीच म्हणतात. पण आपण त्याची जाण ठेवत नाही. आपण आपले शरीर पवित्र ठेवले तर शरीरातल्या देवता प्रसन्न होतील आणि आपल्याला आणखी आरोग्य, सुखसमृध्दी लाभेल. माणसाने आपापसात भांडून, वाईट वागून स्वतःची हानी करण्याऐवजी आपले देहमंदिर, परिसर चांगला करण्यासाठी, लोकांमध्ये सद्भाव वाढण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

(पंढरपूरच्या वारीत एका वारकऱ्याने सांगितलेली ही कथा त्याच्याच शब्दात. संकलन – जितेंद्र मैड)

## घडामोडी

१. अंतरा व गरीब डोंगरी संघटना, पुणे यांच्यातर्फे एप्रिल २०१२ मध्ये पाबळ येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन आणि शेती, शेतीतील अडचणी, सेंद्रिय शेती, शासनाच्या योजना इत्यादीबद्दल चर्चा

२. अंतरामध्ये 'मोबाईल डायग्नोस्टीक सिस्टीम फॉर अर्ली डिटेकन ऑफ मस्टायटीस' या दुधाळ जनावरातील कासदाह रोगावरील संशोधन प्रकल्पास एप्रील २०१२ पासून सुरूवात

३. २६ एप्रिल २०१२ रोजी विज्ञान आश्रम, पाबळ येथील शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात अंतरातर्फे संगिता व राजन यांचे ५० शिक्षकांना औषधी वनस्पती, उपयोग व उगवण या विषयावर प्रशिक्षण

४. अंतरातर्फे ३ व ४ मे २०१२ रोजी 'मार्केट फॉर स्मॉल रुमिनंट्स इन इंडिया' ह्या विषयावरच्या दोन दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन, विविध तज्ञांचा सहभाग

५. वॉटर या संस्थेने पुणे येथे ५ व ६ जून २०१२ दरम्यान आयोजित केलेल्या "National colloquium; connecting the dots: Evolving practical strategies for climate resilient development" ह्या विषयावरच्या दोन दिवसाच्या कार्यशाळेत अंतराच्या डॉ नित्या घोटगेंचा सहभाग

६. ९ जून २०१२ रोजी भारती विद्यापीठ, पुणे यांनी आयोजित केलेल्या "1st Stakeholders workshop on preservation of livestock varieties of Maharashtra" या विषयावरील कार्यशाळेत अंतराच्या डॉ नित्या घोटगेंचा सहभाग

७. १५ जून २०१२ रोजी फ्रान्स येथिल पशुवैद्यक शास्त्राच्या व्दितीय वर्षात शिकत असलेल्या थॉमस डोडी व सबिन डेसे या विद्यार्थ्यांचे अंतरा संस्थेत आगमन; येथील अभ्यासाचा विषय – मेंढ्यांमधील परोपजीवींवर संशोधन

८. ७ व ८ जुलै २०१२ दरम्यान वेचूर कॅटल ट्रस्ट, केरळ यांच्यातर्फे आयोजित केलेल्या "Native livestock breeds for the future and mankind" ह्या विषयावरच्या दोन दिवसाच्या कार्यशाळेत अंतराच्या डॉ नित्या घोटगेंचा सहभाग

९. २७ जुलै २०१२ रोजी स्वित्झरलॅन्डच्या अलिना हर्मिंगगार्टनर या स्वयंसेविकेचे अंतरा संस्थेत आगमन

१०. ७ ते ९ ऑगस्ट २०१२ दरम्यान अझीज प्रेमजी इन्स्टिट्यूट, बंगलुरू यांच्यातर्फे डॉ नित्या घोटगेंना 'इकॉलॉजी अँड डेव्हलपमेंट' या विषयावरील अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आमंत्रण

११. अंतरा, गरीब डोंगरी संघटना व NCAS पुणे यांच्यातर्फे २८ ऑगस्ट २०१२ रोजी जुन्नर तालूक्यातील आदिवासी गावात 'वनहक्क कायदा' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन

१२. ७ ते १४ ऑगस्ट २०१२ दरम्यान उशिरा आलेल्या पावसाचे शेतीवरील परिणाम याबद्दलची माहिती घेण्याकरता राजन कुलये याची पुणे जिल्ह्यातील मुळशी भागातील पाच गावांना अभ्यास भेट

१३. १५ ऑगस्ट २०१२ दरम्यान युनिवर्सिटी ऑफ यॉर्क, इंग्लंड येथून आलेल्या इंद्राणी सिगामाणी या संशोधिकेची अंतराला भेट व १६ ऑगस्ट रोजी ढवळपुरीतील मेंढपाळांची भेट

१४. युवा रूरल असोसीएशन नागपूर यांच्यातर्फे १७ सप्टेंबर २०१२ रोजी “Biotechnology Regulatory Authority of India, Bill 2001” या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन; अंतराच्या डॉ गायत्री यांचा सहभाग

१५. “League of Pastoral People” यांच्यातर्फे जर्मनी येथे दि. ६ ते ७ सप्टेंबर २०१२ दरम्यान आयोजित केलेल्या “The Future of Livestock Keeping” ह्या विषयावरच्या आंतरराष्ट्रीय परीषदेत डॉ नित्या घोटगेंचा सहभाग

**बुक-पोस्ट**

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : **anthra.pune@gmail.com**
वेबसाईट : **www.anthra.org**